Rayat Shikshan Sanstha's,
**Karmaveer Bhaurao Patil Mahavidyalaya, Pandharpur (Autonomous)**
Affiliated to Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University
Karmaveer Path, Pandharpur, Dist. Solapur, 413304 (MH)
Phone: (02186) 223104; Email: kbppandharpur@gmail.com;
Website: www.kbpmpandharpur.in
Founder: Padmabhushan Dr. Karmaveer Bhaurao Patil, D. Lit.

**Board of Examinations and Evaluation**

**Ref. No. KBPM/Exam/1** **Date:16/10/2023**

**परिपत्रक क्र.०१**

**विषय: माहे एप्रिल/मे, २०२३ च्या परिक्षेमध्ये अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना पुढील वर्षामध्ये प्रवेशासंदर्भात विशेष संधी देणेबाबत.**

**संदर्भ :. जा.क्र.पुअहोसोवीसो/पवमूवि/२०२३/७३४०/ दि.१०/१०/२०२३**

अ) अधिष्ठाता मंडळ आणि अभ्यास मंडळाच्या दि.१६/१०/२०२३ रोजीच्या बैठकीतील ठराव क्र.१ प्रमाणे वरील संदर्भाच्या आधारे घेतलेल्या निर्णयानुसार सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, माहे एप्रिल, मे, २०२३ बी.ए./ बी.कॉम./बी.एस्सी./ईसीएस/बी.सी.ए./बी.व्होक. परीक्षेमध्ये अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थांना पुढील वर्गामध्ये तात्पुरता प्रवेश व परीक्षेची विशेष संधी देण्याच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे मान्यता देण्यात येत आहे. सर्व विद्याशाखेतील ३ वर्षाच्या अभ्यासक्रमासाठी Carry On अंतर्गत उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या विशेष संधी संबंधी प्रस्तावित नियमावली खालीलप्रमाणे:

१. सर्व विद्याशाखेतील ३ वर्षांच्या अभ्यासक्रमासाठी प्रवेशित विद्यार्थी जे माहे एप्रिल / मे २०२३ या परीक्षेमध्ये प्रथम वर्ष (सत्र १ व २ किंवा सत्र १ किंवा सत्र २) मध्ये विषयात अनुत्तीर्ण असल्याकारणाने त्यांना द्वितीय वर्षात प्रवेश घेण्यास बाधा येत असेल तर सदर विद्यार्थी Carry On संधी अंर्तगत द्वितीय वर्षास प्रवेशास पात्र राहील.

२. सर्व विद्याशाखेतील ३ वर्षाच्या अभ्यासक्रमासाठी प्रवेशित विद्यार्थी जे माहे एप्रिल/ मे २०२३ या परीक्षेमध्ये प्रथम वर्ष (सत्र १ व २ किंवा सत्र १ किंवा सत्र २) आणि / किंवा द्वितीय वर्ष (सत्र ३ व ४ किंवा सत्र ३ किंवा सत्र ४) मध्ये विषयात अनुत्तीर्ण असल्याकारणाने त्यांना तृतीय वर्षात प्रवेश घेण्यास बाधा येत असेलतरसदर विद्यार्थी Carry On संधी अंर्तगत तृतीय वर्षास प्रवेशास पात्र राहील.

ब) सर्वसाधारण सूचना:

१. वरील नियमावलीनुसार दिलेले प्रवेश हे तात्पुरत्या स्वरूपाचे असतील, यांची संबधित सर्व घटकांनी नोंद घ्यावी.

२. Carry On ची विशेष संधी शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील हिवाळी सत्रातील परीक्षेपुरती राहील.

३) जे विद्यार्थी या विशेष संधीद्वारे वर्ष २०२३-२४ मधील हिवाळी सत्रातील परीक्षेत पूर्वीच्या वर्गातील अनुतीर्ण विषयांमध्ये उत्तीर्ण होतील, त्याचेच प्रवेश प्रचलित Ordinance नुसार नियमित करण्यात येतील.

४) Carry On अंतर्गत देण्यात आलेल्या विशेष संधी संबंधी आवश्यक त्या बाबींची पूर्तता प्रवेश विभागाने करणे बंधनकारक राहील.

५) उपरोक्त प्रस्तावित नियमावली व्यतिरिक्त प्रवेश व परीक्षे संबंधीचे स्वायत्त महाविद्यालयाने आणि संलग्नित विद्यापीठाने विहित केलेले Statute,Ordinance व इतर सर्व नियम लागू राहतील.

६) या अंतर्गत महाविद्यालयाचे सर्व प्रवेश हे दि.२१/१०/२०२३ पर्यंत सुरु राहतील. विद्यार्थांनी प्रवेशाबरोबर लगेच परीक्षा फॉर्म भरणे बंधनकारक आहे. दि. १९/१०/२०२३ पर्यंत प्रवेश घेऊन परीक्षा फॉर्म भरल्यास नियमित परीक्षा शुल्क असेल. दि. २०/१०/२०२३ ते दि. २१/१०/२०२३ रोजी प्रवेश घेऊन परीक्षा फॉर्म भरलेल्या विद्यार्थांना विलंब शुल्कासह परीक्षा फी भरावी लागेल.

७) प्रवेश घेऊन परीक्षा फॉर्म त्याच दिवशी न भरल्यास होणाऱ्या नुकसानीस सदर विद्यार्थी जबाबदार राहील.

संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय,
पंढरपूर. (स्वायत्त)

प्राचार्य,
कर्मवीर भाऊराव पाटील
महाविद्यालय, पंढरपूर.

प्रत माहितीसाठी :

१) प्रवेश व पात्रता विभाग

२) कॅशीयर